सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १९७ | गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. अविनाश संदानशिव
अमळनेर पालिका



सौ. रोशनी डेरे (अमृतकर)
अमळनेर



श्री. अजित पारख
माजी नगरसेवक, अमळनेर



श्री. शशिकांत बडगुजर
ओम साई रेडियम



श्री. संदीप ओसवाल
अमळनेर

# शेताची वाट अडविणाऱ्याचे आधार कार्ड होणार ब्लॉक

## 'दादागिरी' करणाऱ्यांना सरकारी मदतीला मुकावे लागणार; शासनाने उचलली कठोर पावले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेत आणि पाणंद रस्त्यांवरून होणारे वाद आता संपुष्टात येणार आहेत. राज्य सरकारने 'मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेत' ऐतिहासिक बदल केला असून, अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कठोर पावले उचलली आहेत. रस्ता अडवणाऱ्यांचे आधार कार्ड आणि फार्मर आयडी थेट पाच वर्षांसाठी ब्लॉक केले जाणार असल्याने आता 'दादागिरी' करणाऱ्यांना सरकारी मदतीला मुकावे लागणार आहे.

दरम्यान, या योजनेसाठी सक्तीचे भूसंपादन केले जाणार नाही. जे शेतकरी स्वेच्छेने जमीन देतील त्यांना नोंदणीकृत दानपत्र किंवा हक्कसोडपत्र देणे आवश्यक असेल. या प्रक्रियेसाठी लागणारे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी पूर्णपणे माफ करण्यात आली आहे. मात्र, एकदा दिलेली जमीन परत मागता येणार नाही. गाव नकाशातील किंवा सरकारी जागेवरील रस्त्यांवर अतिक्रमण आढळल्यास तहसीलदारांकडून संबंधितांना ७ दिवसांची नोटीस दिली जाईल. या मुदतीत अतिक्रमण न काढल्यास प्रशासन स्वतः कारवाई करून ते हटवणार आहे.

**...तर कंत्राटदारही ब्लॅकलिस्ट होणार**

केवळ शेतकरीच नाही, तर रस्ता बांधणाऱ्या कंत्राटदारावरही कडक निर्बंध आहेत. कामाचा दर्जा निकृष्ट असल्यास किंवा वेळेत काम पूर्ण न केल्यास कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकले जाईल. दोष निवारण कालावधीत रस्त्याची देखभाल करणे कंत्राटदाराला बंधनकारक असेल.

**शेत/पाणंद रस्ते योजना**

शेतमालाची वाहतूक सुलभ व्हावी आणि पावसाळ्यात होणारी शेतकऱ्यांची ओढाताण थांबविण्यासाठी केवळ रस्ते बांधणेच नव्हे, तर ते अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी कायद्याचे कवच या योजनेच्या माध्यमातून देण्यात आले आहे.

**अतिक्रमण करणे भोवणार**

अनेक ठिकाणी शेतकरी शेतरस्त्यावर अतिक्रमण करून वहिवाट बंद करतात. त्यामुळे वाद निर्माण होतात आणि शेतमाल बाहेर काढणे कठीण होते. आता अशा व्यक्तींची गय केली जाणार नाही. त्यांच्यावर थेट प्रशासकीय कारवाईची टांगती तलवार असणार आहे.

**अतिक्रमण उद्‌ध्वस्त करणार**

तक्रार प्राप्त होताच संबंधित तहसीलदारांमार्फत ७ दिवसांची नोटीस दिली जाणार आहे. नोटीस कालावधीत अतिक्रमण न काढल्यास महसूल आणि पोलीस विभाग बळाचा वापर करून रस्ता मोकळा करेल. या कारवाईचा खर्चही संबंधित अतिक्रमणधारकाकडूनच वसूल केला जाईल.

**कुठल्या जमिनींसाठी निर्णय?**

शासकीय मालकीचे पाणंद रस्ते तसेच नकाशावर असलेले पण प्रत्यक्ष वहिवाट बंद असलेले रस्ते व शेतकऱ्यांनी आपसात सामंजस्याने तयार केलेले, पण नंतर अडवलेल्या शेत रस्त्यांसाठी हा निर्णय लागू असणार आहे.

**निर्णयाचा फायदा की तोटा?**

२० टक्के प्रामाणिक शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होईल. रस्त्यांचे वाद मिटल्याने पीक वाहतूक सुलभ होईल. यामुळे आपोआपच संबंधित जमिनीचे भाव वाढण्यास मदत होणार आहे.

> *जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील भांडणांचे मुख्य कारण 'शेतरस्ते' आहेत. या नव्या निर्णयामुळे रस्त्यांच्या कामाला गती येईल आणि अतिक्रमण करणाऱ्यांवर जरब बसेल. शेतकऱ्यांनी सहकार्य केल्यास गावागावांत बारमाही रस्ते तयार होतील.*
>
> *– विजयकुमार ढगे, उपजिल्हाधिकारी, जळगाव.*

# बुलेटसह कोसळल्याने युवकाचा जागीच मृत्यू

## कळमसरे–शहापूर रस्त्यावरील फरशी पुलाजवळील घटना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील कळमसरे - शहापूर रस्त्यावर सुरू असलेल्या फरशी पुलाच्या कामाजवळ मोटारसायलकल (बुलेट) खाली कोसळली. त्यामुळे सुनील सीताराम शिंदे (वय २६, रा. सोनगीर, जि. धुळे) याचा जागीच मृत्यू झाला. सोमवार, दि.६ एप्रिल रोजी रात्री ही घटना घडली.



याबाबत अधिक माहिती अशी, की सुनील शिंदे हा कळमसरे येथे लग्नासाठी कुटुंबीयांसमवेत आला होता. हळद कार्यक्रम आटोपून रात्री मोटारसायकवरून (बुलेट) घरी परतताना रात्री शहापूर - कळमसरे दरम्यान सुरू असलेल्या फरशी पुलाच्या कामांतर्गत खड्ड्यात मोटारसायकलसमवेत खाली कोसळला. त्यात खड्ड्यातील सिमेंट पाईपच्या कडेला मधोमध अडकल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. मंगळवारी, सकाळी ७ च्या सुमारास ही घटना उघडकीस आली.

मारवड पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक जिभाऊ पाटील, पोलीस शिपाई यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. त्यांनी मृतास विच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविले. मृत सुनील शिंदे याच्यामागे वृद्ध आई, वडील, पत्नी, मुलगी, मुलगा असा परिवार आहे. सुनीलच्या या अपघाती निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. वाहनावरील ताबा सुटून पुलाच्या कामाच्या ठिकाणी अडकल्याने जागीच मृत्यू झाल्याची नोंद मारवड पोलिसांत करण्यात आली आहे. पोलिस शिपाई संजय सूर्यवंशी पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, फरशी पुलाजवळ सुरक्षा कठडे तसेच सूचना फलक अपघातानंतर लावले गेल्याचा आरोप मृताच्या कुटुंबातील सदस्य व नातेवाईकांनी घटनास्थळी केला.



*अमळनेर : राजपूत एकता मंचातर्फे नवनिर्वाचित नगरसेविका कविता विजयसिंह राजपूत, कल्पना भरतसिंग परदेशी व स्वाती सूरजसिंह परदेशी यांच्यासह 'एमपीएससी' उत्तीर्ण प्रांजल व मानसी पाटील या भगिनींचाही सत्कार करताना प्रा. धर्मसिंह.*

# नगरसेवकांसह परदेशी भगिनींचा राजपूत एकता मंचातर्फे गौरव

## समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना सन्मानित करून युवकांना दिली प्रेरणा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील राजपूत एकता मंचातर्फे पालिका निवडणुकीत विजयी झालेल्या नगरसेवकांसह महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात आलेल्या परीक्षेत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा नुकताच सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

यात समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींना सन्मानित करून युवकांना प्रेरणा देण्याचा उद्देश या कार्यक्रमातून साध्य करण्यात आला.

येथील हाशीम प्रेमजी संकुलातील प्रफुल्ल कॉमर्स ॲकॅडमी येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. धर्मसिंह पाटील होते. नवनिर्वाचित नगरसेविका कविता विजयसिंह राजपूत, कल्पना भरतसिंग परदेशी व स्वाती सूरजसिंह परदेशी यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. तसेच तालुक्यातील खडके येथील प्रांजल वसंत पाटील यांची कृषी उपसंचालक पदावर निवड आणि मानसी वसंत पाटील यांची मंडळ कृषी अधिकारी पदावर नियुक्ती झाल्याने या भगिनींचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी दोन्ही भगिनींनी मनोगत व्यक्त करीत या सन्मानामुळे आपले मनोबल अधिक वाढल्याची भावना व्यक्त केली. त्यांच्या वडिलांनी, वन विभागात आरएफओ पदावर कार्यरत वसंत पाटील यांनीही समाजबांधवांनी केलेल्या या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी पालिका निवडणूक लढविणारे चेतन राजपूत व रणजित पाटील यांचाही गौरव करण्यात आला. स्वर्णदीप राजपूत यांनी सूत्रसंचालन केले. अनिल पाटील यांनी आभार मानले. या सोहळ्यास राजपूत एकता मंचचे अध्यक्ष रणजित पाटील तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिनविशेष
०९ एप्रिल

- सूक्ष्मजीवशास्त्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी, शास्त्रज्ञ पी.एम. भार्गव यांना आर.डी. बिर्ला राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- लता मंगेशकर यांना अवधारत्न आणि साहू सूरणमनामने सन्मानित करण्यात आले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

## शाळेजवळ तंबाखू विक्री; टपरीचालकाविरुद्ध गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील शाळेजवळ तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या टपरीचालकावर पोलीसांनी कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य पदार्थ विक्री प्रतिबंध कायद्यान्वये ही कारवाई करण्यात आली आहे. पोलीस शिपाई उज्ज्वलकुमार मस्के यांनी यासंदर्भात फिर्याद दिली होती. ते अमळनेर पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध पथकात कार्यरत आहेत.

गेल्या ७ एप्रिल रोजी सकाळी सुमारे अकराच्या सुमारास येथील ग्लोबल शाळेसमोरील गलवाडे रोड परिसरात पोलीस पथक पेट्रोलिंग करत असताना एक टपरीचालक तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करताना आढळून आला. शाळेनजीकच्या परिसरात अशा पदार्थांची विक्री करण्यास कायद्याने बंदी असताना संबंधित व्यक्ती हा व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले. त्या अनुषंगाने त्याची चौकशी केली असता त्याने आपले नाव नामदेव भिमराव पाटील (वय ३५, रा. भवानी चौक, ताडेपुरा, अमळनेर) असे सांगितले. त्याच्या टपरीतून विविध कंपन्यांच्या

**पान २ वर**

# सद्‌गुरू प्रसाद महाराजांची जळगावात धान्यतुला

## ज्येष्ठांनाही गौरविले; अमळनेरकर महाराज सेवा समितीतर्फे कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




*अमळनेर : अमळनेरकर महाराज सेवा समिती, जळगावतर्फे रविवार, दि. ५ एप्रिल रोजी जळगावातील नेरी नाक्याजवळील पांजरापोळ संस्थानात पराग महाराज चातुर्मास्य यांचे विशेष निरूपण झाले. याप्रसंगी उपस्थित अमळनेरच्या संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थानाचे गादीपती सद्‌गुरू प्रसाद महाराज,*

अमळनेर : येथील अमळनेरकर महाराज सेवा समिती, जळगावतर्फे रविवार, दि. ५ एप्रिल रोजी जळगावातील नेरी नाक्याजवळील पांजरापोळ संस्थानात पराग महाराज चातुर्मास्य यांचे विशेष निरूपण झाले. त्यात विविध क्षेत्रांत दीर्घकाळ सेवा देणाऱ्या सहा ज्येष्ठांचा गौरव संतश्री सखाराम महाराज संस्थानचे गादीपती सद्‌गुरू प्रसाद महाराज यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन करण्यात आला. तसेच समारोप सत्रात प्रसाद महाराजांची धान्यतुला झाली.

'आध्यात्मिक शक्ती आणि मानवी जीवन' या विषयावर पराग महाराज चातुर्मास्य यांनी निरूपण केले. मनुष्यत्व, ज्ञान आणि मुमुक्षुत्व या तीन अपेक्षांनी मानवी जीवन अवलंबून आहे. मनुष्याने सदाचरणी राहिले पाहिजे. तसेच मृत्यूला मनुष्याने घाबरले पाहिजे. मनुष्याने सदाचरण पाळून भगवंताच्या नामस्मरणात गेले पाहिजे. अध्यात्माची जोडच मानवी जीवनाला प्रगल्भ करू शकते. मृत्यूला घाबरून तरी भगवंताच्या नामस्मरणात लीन झाले पाहिजे. साधकाने प्राथमिक सुखाचा उपभोग घेऊन चालणार नाही. सुखात राहिल्यावर भगवंताची सेवा होत नाही याचा पश्चात्तापही झाला पाहिजे. हा नरदेह कशासाठी मिळाला याची जाणीव प्रत्येकाला असली पाहिजे. आपले जीवन भगवंताच्या सेवेत लावले पाहिजे. कारण मृत्यू कधीही येऊ शकतो, असे त्यांनी या विशेष प्रवचनातून सांगितले. तुलेचे धान्य अन्नछत्रांना

अन्न हे पूर्णब्रह्म मानले जाते. निसर्ग, ईश्वराप्रती कृतज्ञता व्यक्त होते. धान्यतुला केल्याने कुंडलीतील ग्रहदोष शांत होण्यास मदत होते. स्वतःला तराजूच्या एका पारड्यात बसविणे आणि दुसऱ्या बाजूला धान्य ठेवणे हे प्रतीक आहे की हे शरीर आणि सर्व संपत्ती ईश्वराची आहे. तुलेद्वारे जमा झालेले धान्य गरजू, गरीब किंवा अन्नछत्रांना दिले जाते.

**या धान्यांसह तुला**

सखाराम महाराज संस्थानचे गादीपती सद्‌गुरू प्रसाद महाराजांची धान्याची तुला करण्यात आली. यात ८८ किलो तुपासह तूरडाळ, हरभराडाळ, गहू, तांदूळ, साबूदाणा, भगर, ज्वारीया धान्यासह रवा, खडीसाखर, साखर, भगर, शेंगदाणे, गूळ आदी खाद्यपदार्थांची तुला करण्यात आली. त्यात गहू : सूर्याची कृपा होण्यासाठी. तांदूळ : चंद्र कृपा आणि शांतीसाठी. ज्वारी-बाजरी : जनकल्याणासाठी. सप्तधान्य : सर्व ग्रह शांतीसाठी देण्यात आले.

मानपत्र देऊन गौरव

ज्ञानेश्वर माऊली महाराज चातुर्मास्य, देवेंद्रशास्त्री रामचंद्र गढीकर, धोंडू देक्चंद माळी, महेशकुमार महाराज त्रिपाठी, रूपचंद महाराज औरंगपूरकर, डॉ. गिरीश सहस्रबुद्धे या सहा जणांचा याप्रसंगी मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी विविध संतही उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर, फुले जयंती महोत्सवानिमित्त अमळनेरमध्ये रांगोळी, चित्रकला स्पर्धा

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक परिषद, समितीतर्फे आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक परिषद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती २०२६' यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आणि महात्मा फुले यांचा जयंती महोत्सव कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधून शहरात विविध सामाजिक उपक्रम आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या जयंती महोत्सवाच्या निमित्ताने शालेय विद्यार्थी, तरुण आणि सर्वसामान्य नागरिकांच्या कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्यात सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने खालीलप्रमाणे स्पर्धा घेण्यात



येणार आहेत. या स्पर्धेत शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्याचे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

**स्पर्धा आणि उपक्रम**

रांगोळी आणि चित्रकला स्पर्धा : ११ एप्रिल : सकाळी ७ वाजता- डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाचे प्रांगण.
भव्य मॅरेथॉन स्पर्धा : १२ एप्रिल : सकाळी ६ वाजता महाराणा प्रताप चौकातून सुरूवात होईल.

गटनिहाय पारितोषिके : ही स्पर्धा 'खुला गट' आणि 'महिला गट' अशा स्वतंत्र गटांमध्ये होईल.
खुला गट : प्रथम - ७ हजार, द्वितीय - ५ हजार, तृतीय - ३ हजार.
महिला गट : प्रथम - ५ हजार, द्वितीय - ३ हजार, तृतीय - २ हजार.
सामान्य ज्ञान स्पर्धा : १२ एप्रिल : सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत साने गुरुजी शाळेत होईल.

# संपादकीय

## डोनाल्ड ट्रम्प यांचा वारंवार मुखभंग

अनेक युद्धे थांबविल्याचे दावे करून स्वतःचीच पाठ थोपटून घेणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांची इराण युद्धाबाबत 'धरले तर चावते,' अशी अवस्था झाली आहे. वारंवार दिलेली मुदत उलटून गेल्यावर त्यांनी इराणला निर्वाणीचा इशारा दिला; मात्र त्याचा परिणाम उलटा होऊन अमेरिकेतूनच त्यांच्यावर टीकेचा भडिमार सुरू झाला आहे. सर्वोच्च नेत्याच्या हत्येनंतरही तब्बल महिनाभर शत्रू बधत नसल्याचे लक्षात आल्यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला पाषाणयुगात पोहोचविण्याची दिलेली धमकी आणि वापरलेली अर्वाच्य भाषा, यातून अमेरिकेचे नेतृत्व हताश आणि सैरभैर झाल्याचे दिसते. एकीकडे ते मर्दुमकी गाजविल्याचा आव आणताहेत, इराणला धमकावताहेत आणि दुसरीकडे शरण येण्यासाठी इराणला मुदतीवर मुदत देताहेत. इराण मात्र त्यांच्या कोणत्याही प्रस्तावांना भीक घालायला तयार नाही. या परिस्थितीत शांततेच्या शक्यता मावळल्याने युद्धस्थिती लांबणार, अशीच शक्यता असून, त्याचे परिणाम भारतासह साऱ्या जगाला दीर्घ काळ भोगावे लागणार, असे दिसते. इजिप्त, तुर्कीये आणि पाकिस्तान यांच्या पुढाकाराने इराणकडे शस्त्रसंधीचा प्रस्ताव सोपविण्यात आला होता. त्यातील ४५ दिवसांचा युद्धविराम आणि होर्मुझची सामुद्रधुनी जहाजांसाठी खुली करणे अशा अटी इराणने फेटाळल्या आहेत; उलटपक्षी कायमस्वरूपी युद्धविराम, पुन्हा हल्ला होणार नाही, याची हमी आणि होर्मुझमधील जहाजांच्या वाहतुकीपोटी काही रक्कम इराणला फेरउभारणीसाठी देणे अशा अटी इराणने घातल्या आहेत. भरीस भर म्हणून ट्रम्प यांनी तेल प्रकल्पांवर हल्ले न करण्याबाबत दिलेली हमी धुडकावून इस्रायलने पुन्हा इराणच्या तेल प्रकल्पांवर केलेले हल्ले आणि इराणचे प्रतिहल्ले यांमधून युद्धझळा तीव्र झाल्या आहेत.

हडेलहप्पीबाबत ट्रम्प यांची ख्याती होतीच; आता तर महासत्तेच्या अध्यक्षपदाचे भान विसरून सुसंस्कृत भाषेच्या सर्व मर्यादा त्यांनी पार केल्या. काही दिवसांपूर्वी जपानच्या अध्यक्षांसमोर त्यांनी त्या देशाच्या जखमेवर मीठ चोळले. पाठोपाठ फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या कौटुंबिक जीवनावर तारे तोडले आणि आता इराणबाबत अर्वाच्य भाषेचा वापर करतानाच पूल-वीजप्रकल्प उद्ध्वस्त करण्याची धमकी दिली. एकंदर ट्रम्प यांचे समाजमाध्यमांतील संदेश आणि भाषणांमधून त्यांचा हताशपणाच दिसून येतो. आता त्यांची लोकप्रियता दिवसेंदिवस घटत आहे. येत्या काही दिवसांतील मध्यावधी निवडणुकांमध्ये रिपब्लिकन पक्षाला फटका बसण्याचे अंदाज आहेतच; तसेच युद्धखोरीसह वाढती महागाई, बेरोजगारी आणि 'एपस्टिन फाइल'मुळे पदरात आलेली बदनामी अशा विविध कारणांमुळे पुढील सार्वत्रिक निवडणुकांमध्येही सत्तेवर येण्याच्या आशा मावळत चालल्या आहेत, असेच निष्कर्ष तेथील निरनिराळ्या पाहण्यांतून पुढे येत आहेत. त्यामुळे अगदी आत्तापर्यंत अमेरिकेला गतवैभव प्राप्त करून देण्याच्या आश्वासनामुळे जनतेच्या गळ्यातील ताइत बनलेले ट्रम्प आता त्यांच्याच पक्षाच्या गळ्यातील धोंड बनू पाहत असून, त्यांचा वारंवार मुखभंग होत आहे.

युद्ध संपविण्यासाठी ट्रम्प आतुर झाले असले, तरी केवळ दीड महिन्याच्या प्रस्तावित 'शांतते'च्या काळात अमेरिका-इस्रायल नव्याने जमवाजमव करणार नाही किंवा जमिनीवर सैन्य उतरवणार नाही, याची खात्री नसल्याने इराणला कायमस्वरूपी युद्धबंदी हवी आहे आणि युद्धखोरीच्या तारेतील इस्रायल कोणाचे ऐकायला तयार नाही, हा त्यामधील खरा पेच आहे. अमेरिका व इस्रायल यांच्या हल्ल्यांमध्ये इराणमध्ये मोठी जीवितहानी झाली असून, संरक्षण व तेलप्रकल्पांमध्येही मोठे नुकसान झाले आहे. मात्र, होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक बंद पाडून इराणने तेल उत्पादक आणि वापरकर्त्या देशांची कोंडी केल्याने जागतिक अर्थव्यवस्थेचे दिवसागणिक होत असलेले नुकसान तुलनेने कितीतरी मोठे आहे. दररोज उलटसुलट भूमिका घेऊन तेलाच्या दरात चढउतार आणि शेअर बाजारांमध्ये भूकंप घडवण्यातून स्वतः ट्रम्प आणि सट्टेबाजांचे उखळ पांढरे होत असले, तरी अनेक देशांना या इंधन व खतांसारख्या वस्तूंच्या तुटवड्याचे चटके बसू लागले आहेत. भारतामध्ये पेट्रोल-डिझेलचा तुटवडा अद्याप नसला, तरी मात्र गॅसटंचाईमुळे कारखाने आणि हॉटेल व्यावसायिकांचे डोळे पांढरे झाले आहेत. खरीप हंगामासाठी खतांचा पुरवठा सुरळित व्हावा, यासाठी मिळेल तेथून खते मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, युद्ध लांबले तर अन्य देशही हात आखडता घेतील, असेच चित्र आहे. दुसरीकडे आखाती देशांचे मार्ग खुंटल्यामुळे कांदा, हापूससारखे जिन्नस व अन्य वस्तूंची आयात-निर्यातही रखडली आहे. अशा काळात इंधन-गॅस आणि खतांसाठी युद्धपातळीवर पावले उचलणे आणि भविष्यात ऊर्जासुरक्षेबाबत 'मिशन मोड'वर काम केले नाही, तर या युद्धझळांमुळे सारे जगच पुन्हा पाषाणयुगाकडे ढकलले जाऊ शकते, याचे भान महासत्तांना कधी येणार?

# डेव्हिड वॉर्नरला अटक!

## पाकिस्तानातून ऑस्ट्रेलियात पोहचताच मोठी कारवाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ऑस्ट्रेलियाचा माजी धडाकेबाज फलंदाज डेव्हिड वॉर्नर याच्यावर मद्यपान करून वाहन चालवल्याप्रकरणी (ड्रंक अँड ड्रायव्हिंग) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिडनीमधील मारौब्रा येथे एका 'रँडम ब्रीथ टेस्ट'दरम्यान (श्वसन चाचणी) पोलिसांनी त्याला थांबवले असता ही कारवाई करण्यात आली.

**नेमकी घटना काय?**



एका वाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार ३९ वर्षीय वॉर्नरने तपासणी नाक्यावर पोहोचण्यापूर्वीच आपली कार थांबवून पार्क करण्याचा प्रयत्न केला. मात्र, संशय आल्याने पोलिसांनी त्याच्या वाहनापाशी जाऊन त्याची रँडम ब्रीथ टेस्ट घेतली. या चाचणीत तो मद्याच्या नशेत असल्याचे आढळले. पोलिसांनी तात्काळ वॉर्नरला ताब्यात घेऊन मारौब्रा पोलीस ठाण्यात नेले, जिथे त्याच्या रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण ०.१०४ इतके नोंदविण्यात आले. या प्रकरणी त्याला पुढील महिन्यात न्यायालयात हजर राहावे लागणार आहे.

**पीएसएल सोडून मायदेशी परतला**

वॉर्नर सध्या पाकिस्तान सुपर लीग (पीएसएल) २०२६ मध्ये 'कराची किंग्स'चे नेतृत्व करत आहे. स्पर्धेतील सामन्यांमध्ये काही दिवसांची विश्रांती असल्याने तो काही काळासाठी ऑस्ट्रेलियाला परतला होता. या घटनेनंतर तो पुन्हा पाकिस्तानात रवाना झाला असला, तरी सुनावणीसाठी त्याला पुन्हा ऑस्ट्रेलिया गाठावे लागणार आहे.

**वॉर्नरची देदीप्यमान कारकीर्द आणि 'सिडनी थंडर'शी करार**

ऑस्ट्रेलियाच्या महान सलामीवीरांपैकी एक असलेल्या वॉर्नरने २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. मात्र, तो 'बिग बॅश लीग'सह जगभरातील विविध फ्रँचायझी क्रिकेट स्पर्धांमध्ये सक्रिय आहे.

**बीबीएलमधील कामगिरी**

नुकत्याच पार पडलेल्या हंगामात वॉर्नरने 'सिडनी थंडर'साठी उत्कृष्ट कामगिरी केली. त्याच्या संघाची कामगिरी निराशाजनक ठरली असली, तरी वॉर्नरने ८ सामन्यांत ४३३ धावा कुटल्या. विशेष म्हणजे, त्याच्या खालोखाल सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजापेक्षा वॉर्नरच्या धावा २०१ ने जास्त होत्या. त्याच्या या कामगिरीमुळे त्याला स्पर्धेतील अधिकृत 'टीम ऑफ द टूर्नामेंट'चा कर्णधार म्हणून गौरवण्यात आले.

**पुढील हंगामासाठी सज्ज**

वॉर्नरने आगामी बीबीएल हंगामासाठी पुन्हा एकदा सिडनी थंडरशी करार केला आहे. याबद्दल बोलताना तो म्हणाला, "गेले वर्ष आमच्यासाठी आव्हानात्मक होते, पण चाहत्यांच्या अफाट पाठिंब्यामुळे मी या संघासोबत राहण्याचा निर्णय घेतला. माझ्यात अजून बरेच क्रिकेट शिल्लक असून संघाला विजय मिळवून देण्यासाठी मी सज्ज आहे."

# पोट फुगणे म्हणजे काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



हा विकार मंदाग्नीमुळे होतो. वायूशी संबंधित असणारा हा विकार पोटात/कोष्टात निर्माण होतो. तोंडापासून गुदमार्गापर्यंतच्या भागाला कोष्ट म्हणतात. जास्त व्यायाम, जास्त प्रमाणात मैथुन, जास्त वेळ लिहिणे-वाचणे, रात्री जागरण करणे, अधिक श्रम करणे, कडसर, लाल मिरची आणि गरम मसाल्याच्या जेवणामुळे हा विकार होतो.

१) तुळशीच्या पानांचा रस काढून गरम पाण्यात टाकून प्यावा थोड्याच वेळात आराम पडेल.
२) पोट फुगून पित्त प्रकोप झाला असल्यास तुळशीची पाच पाने, पाच बदामांचा गर, पाच काळ्यामिरी आणि दोन छोट्या वेलची वाटून बारीक करून घ्याव्यात एक पाव दुधात साखर आणि एक चमचा हे चूर्ण घालून रात्री झोपताना आणि सकाळी काही न खाता प्यावे.
३) 250 मि.ली. दुधात ३ चमचे शुद्ध मध मिश्रण करावे. हे दूध कोमट असताना घोट-घोट करून प्यावे. प्रथम दूध उकळावे व नंतर मध टाकावे. या गोष्टीची खबरदारी घ्यावी की, मध टाकून उकळू नये.
४) दालचिनी ५ ग्रॅम कुटून दुधात टाकून उकळावे. दूध कोमट झाल्यानंतर मध टाकून प्यावे. पोटातील वायू हा नष्ट होतो.
५) गायीच्या दुधात एरंडतेल टाकून पिल्याने मलावरोध नष्ट होतो आणि पोटातील वायूचा त्रासदेखील नाहीसा होतो. रोगाचा जोर वाढल्यास दूध प्यावे व नंतर लसणाच्या चटणीने हलक्या हाताने पोटावर मालिश करावी.
६) दूध पिणाऱ्या बाळांसाठी मातेच्या दुधात मध टाकून पिण्यास द्यावे.याला मिश्रण करण्याची गरज नाही.
७) चार रत्ती जायफळ चूर्ण आणि एक चमचा सुंठ मधात मिसळून सेवन करावे.
८) अर्धा कप गाजराचा रस आणि दोन चमचे पत्ताकोबीचा रस मधात घालून दररोज प्यावा.
९) कच्चा बटाटा कुस्करून त्याचा रस काढावा. त्यात अर्धा चमचा मध टाकून चाटण घ्यावे.
१०) मधासह एक चमचा अद्रक रस आणि एक चमचा लिंबाचा रस सेवन करावा.
११) एक चमचा मेथ्याच्या चूर्णात मध मिसळून सात दिवस सेवन करावे.
१२) मुळा, मुळ्याची पाने आणि काकडीचे सॅलाड करून अनशेपोटी नियमित स्वरूपात खावे. यामुळे गॅसेसच्या त्रासापासून आपली सुटका होऊ शकते.
१३) पाव चमचा वेलचीचे चूर्ण व एक चिमूट भाजलेले हिंग घ्यावे. यांना लिंबू पाण्यासोबत घ्यावे.
१४) सुंठ, बडीशेप, सेंधीलोण, बाळहिरडा प्रत्येकी दहा-दहा ग्रॅम घेऊन कुटावे. त्यात तीन ग्रॅम हिंग चूर्ण टाकावे, अर्धा चमचा चूर्ण गरम-गरम पाण्यासोबत घ्यावे.
१५) मोहरी दोन ग्रॅम व एक ग्रॅम हिंग या दोघांना एकत्र करून गरम पाण्यासोबत घ्यावे.
१६) हिंग उगाळून गरम करून घ्यावे. नंतर पोटावर सावकाशपणे लावावे.

# कचरा वेचणाऱ्या गायकाला दिला आयफोन गिफ्ट, कामही देणार

## शिखर पहारियाच्या मनाचा मोठेपणा; जान्हवी कपूरचेही 'लव्ह लाईक'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


अभिनेत्री जान्हवी कपूर बऱ्याचदा वैयक्तिक कारणांमुळे चर्चेत असते. ती आपल्या बॉयफ्रेंडचे अनेकदा कौतुक करताना दिसते. जान्हवी कपूर आणि तिचा बॉयफ्रेंड शिखर पहारियाचे फोटो सोशल मीडियात व्हायरल होत असतात. शिखर उद्योजक असून, स्टाईल आयकॉन देखील आहे. शिखर पहारिया पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. पण सध्या त्याच्या चर्चेत येण्यामागील कारण वेगळे आहे. शिखर पहारियाचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल होत आहे. या व्हिडिओत शिखर अनाथ आणि रस्त्यावरुन कचरा वेचणाऱ्या मुकेश महादेवला आर्थिक मदत आणि पाठिंबा देणार असल्याचे जाहीर केले. माहितीनुसार मुकेश महादेवला गायनाची आवड आहे. दरम्यान, मुकेश महादेवच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठीही शिखर प्रयत्न करणार असल्याचे त्याने सांगितले.

शिखर पहारियाकडून स्ट्रीट सिंगर मुकेश महादेवची मदतसध्या सोशल मीडियात स्ट्रीट सिंगर मुकेश महादेवचा गायनाचा व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल होत आहे. नेटकऱ्यांकडून त्याच्या टॅलेंटचं विशेष कौतुक होत आहे.

# आपल्याला डोळे किती, तर दोनच!

## पण त्याचे वाक्प्रचार किती ते पाहा; ही आहे आपल्या माय मराठीची समृद्धी..!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



डोळा लागणे (झोप लागणे), डोळा मारणे (इशारा करणे), डोळा चुकवणे (गुपचूप जाणे), डोळे येणे (नेत्रविकार होणे), डोळे जाणे (दृष्टी गमावणे), डोळे उघडणे (सत्य उलगडणे), डोळे मिटणे (मृत्यू पावणे), डोळे खिळणे (एकटक पाहणे), डोळे फिरणे (बुद्धी भ्रष्ट होणे), डोळे दीपणे (थक्क होणे), डोळे वटारणे (नजरेने धाक दाखविणे), डोळे विस्फारणे (आश्चर्याने पाहणे), डोळे पांढरे होणे (भयभीत होणे), डोळे भरून येणे (रडू येणे), डोळे भरून पाहणे (समाधान होईपर्यंत पाहणे), डोळे फाडून पाहणे (आश्चर्याने निरखून पाहणे), डोळे लावून बसणे (वाट पाहात राहणे), डोळेझाक करणे (दुर्लक्ष करणे), डोळ्यांचे पारणे फिटणे (पूर्ण समाधान होणे), डोळ्यात प्राण आणणे (आतुरतेने वाट पाहणे), डोळ्यांत धूळ फेकणे (फसवणूक करणे), डोळ्यांत तेल घालून बघणे (लक्षपूर्वक पाहणे), डोळ्यांत डोळे घालून पाहणे (एकमेकांकडे प्रेमाने बघणे), डोळ्यात सलणे/खुपणे (दुसऱ्याचे चांगले न बघवणे), डोळ्यांत अंजन घालणे (दुसऱ्याला परखडपणे त्याची चूक दाखवून देणे), डोळ्यांवर कातडे ओढणे (जाणूनबुजून दुर्लक्ष करणे), डोळ्याला डोळा नसणे (काळजीमुळे झोप न लागणे), डोळ्याला डोळा भिडवणे (नजरेतून राग व्यक्त करणे), डोळ्याला डोळा न देणे (अपराधी भावनेपोटी एखाद्याच्या नजरेस नजर न मिळविणे), दुसऱ्याच्या डोळ्यातले कुसळ दिसणे; पण स्वतःच्या डोळ्यातले मुसळ न दिसणे (दुसऱ्याची छोटीशी चूक दिसणे; पण स्वतःची मोठी चूक न दिसणे).

# निरमा गर्ल नेमकी कोण होती?

## अखेर सस्पेन्स संपला; स्टोरी वाचून रडू कोसळेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'निरमा' या डिटर्जंट पावडरच्या पॉकेटवर फ्रॉग परिधान केलेल्या एका छोट्या मुलीचा फोटो आहे. पांढऱ्या शुभ्र रंगाचा फ्रॉग तिने परिधान केल्याचे दिसते. आतापर्यंत अनेकांनी ही मुलगी नेमकी कोण असावी, असे विचारलेले आहे. त्यामुळे ती मुलगी कोण हे जाणून घेऊया.

कधीकाळी देशभरात निरमा नावाचे डिटर्जंट पावडर मोठ्या प्रमाणात वापरले जायचे. डिटर्जंट पावडर म्हणजे फक्त निरमा असाच सगळ्यांचा समज झाला होता.

'आश्चर्य वाटेल की 'निरमा' या डिटर्जंट पावडरवर या कंपनीच्या मालकाच्या मुलीचा फोटो आहे. निरमा कंपनीचे मालक करसनभाई पटेल यांची मुलगी निरुपमा पटेल यांचा हा फोटो आहे.

एका अपघातात निरुपमा पटेल




यांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे आपल्या मुलीची आठवण म्हणून त्यांनी तिचा फोटो सगळीकडे लावण्याचे ठरवले. त्यांनी १९६९ मध्ये कपडे धुण्यासाठी लागणाऱ्या डिटर्जंटची निर्मिती करण्यास सुरूवात केली. करसन पटेल हे निरुपमा पटेल हिला प्रेमाने 'निरमा' म्हणून हाक मारत. आपल्या मुलीची आठवण म्हणून मुलीचे नाव देशभरात पोहोचावे म्हणून त्यांनी आपल्या कंपनीला निरमा असे नाव दिले. आज निरुपमा पटेल अजरामर आहे.

# शाळेजवळ तंबाखू विक्री; टपरीचालकाविरुद्ध गुन्हा

पान १ वरून

सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. या कारवाईत पोलीस शिपाई सूर्यकांत साळुंखे व हवालदार सनील विश्वास तेली यांचा सहभाग होता. पंचांसमक्ष मुद्देमालाचा पंचनामा करून तो जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, यासंदर्भात आरोपीस न्यायालयात हजर राहण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास हवालदार सुनील तेली करीत आहेत.


# अंपायरला चाकूने वार करून संपवले

## मैदानावर रक्ताचा सडा; क्रिकेट विश्वाला हादरवून सोडणारी घटना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतामध्ये एका बाजूला आयपीएलचा २०२६ थरार शिगेला पोहोचला आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू आणि पंजाब किंग्सच्या धडाकेबाज कामगिरी करत चाहत्यांचे लक्ष वेधले आहे. मात्र दुसऱ्या बाजूला आंध्र प्रदेशातून एक अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना समोर आली आहे. विशाखापट्टणम येथे स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या क्रिकेट सामन्यात अंपायरची हत्या करण्यात आली. या घटनेमुळे क्रीडा क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

**रन आऊटचा वाद**



रन आऊटच्या वादातून घटना

मिळालेल्या माहितीनुसार रविवार, दि. ४ एप्रिल रोजी एका स्थानिक क्रिकेट सामन्यात २१ वर्षीय डोला अजित बाबू आपल्या मित्र बुडूमुरी चिरंजीवीसोबत अंपायरिंग करत होता. सामन्यादरम्यान रन आऊटच्या निर्णयावरून खेळाडूंमध्ये वाद निर्माण झाला. मात्र अजित बाबू आणि चिरंजीवी यांनी मध्यस्थी करून परिस्थिती शांत केली. यानंतर कांता किशोर नावाच्या एका प्रेक्षकाने संतापाच्या भरात अंपायर आणि खेळाडूंशी वाद घालत शिवीगाळ केली.

पोलिसांच्या माहितीनुसार सामना संपल्यानंतर कांता किशोरने वाद मिटवण्याच्या बहाण्याने अंपायरांना दुसऱ्या ठिकाणी बोलावले. अजित बाबू आणि चिरंजीवी काही मित्रांसह त्या ठिकाणी गेले, पण तिथे पुन्हा वाद चिघळला. याच दरम्यान कांता किशोरने चाकू काढून दोघांवर हल्ला केला. या हल्ल्यात अजित बाबू यांच्या छातीत वार करण्यात आला, ज्यामुळे तो घटनास्थळीच कोसळला. स्वतःचा बचाव करताना चिरंजीवी गंभीर जखमी झाला. मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आणखी एका व्यक्तीलाही दुखापत झाली.

जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. अजित बाबूची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना अपोलो हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे स्थानिक परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# मराठी साहित्यातील तत्त्वज्ञानाचे दीपस्तंभ
# पंडित कवी वामन पंडित



स्मृतिदिन विशेष

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मराठी साहित्याच्या सुवर्णपानांमध्ये ज्यांचे नाव आदराने घेतले जाते, अशा पंडित कवी वामन पंडित यांचा ९ एप्रिल रोजी स्मृतिदिन. हा त्यांच्या असामान्य साहित्यसेवेची आठवण करून देणारा महत्त्वाचा दिवस आहे. आपल्या काव्यातून त्यांनी केवळ भक्तीच नव्हे, तर तत्त्वज्ञान, अध्यात्म आणि संस्कृत-प्रचुर विद्वत्ता यांचा सुंदर संगम घडवून आणला.

वामन पंडितांचा जन्म सतराव्या शतकात झाला. त्यांचे बालपण विद्यार्जनात गेले आणि लहानपणापासूनच त्यांना संस्कृत भाषेचे गाढे ज्ञान प्राप्त झाले. पुढे त्यांनी वेद, उपनिषद, पुराणे आणि विविध शास्त्रांचा सखोल अभ्यास करून आपली स्वतंत्र साहित्यशैली विकसित केली. त्यांच्या काव्याची सर्वांत मोठी वैशिष्ट्ये म्हणजे त्यातील तत्त्वज्ञानाची खोली आणि भाषेची समृद्धता. त्यांनी भगवद्गीतेवरील भाष्यरूप ग्रंथ 'यथार्थ दीपिका' लिहून मराठी वाचकांसाठी गीतेतील गूढ तत्त्वज्ञान सोप्या भाषेत उलगडले. हा ग्रंथ आजही अभ्यासकांसाठी मार्गदर्शक मानला जातो.

वामन पंडितांनी रचलेली स्तोत्रे, अभंग आणि इतर काव्यरचना यांमध्ये भक्तीभाव आणि ज्ञान यांचा सुरेख संगम दिसून येतो. त्यांच्या लेखनात वैदिक परंपरेचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो, परंतु त्याचबरोबर सामान्य जनतेलाही समजेल अशी साधी आणि प्रभावी मांडणी ही त्यांची खासियत होती. त्यांनी आपल्या काव्यातून धर्म, नैतिकता आणि जीवनमूल्यांचा प्रचार केला. त्यांच्या रचनांमध्ये आत्मज्ञान, कर्मयोग आणि भक्तियोग यांचा समतोल दृष्टिकोन आढळतो. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ धार्मिक न राहता, जीवनमार्गदर्शक ठरते.

वामन पंडितांचे कार्य हे मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यांच्या योगदानामुळे मराठी भाषेला तत्त्वज्ञानात्मक अभिव्यक्तीचे नवे परिमाण मिळाले. आजही त्यांचे साहित्य अभ्यासक, संशोधक आणि रसिक वाचकांसाठी प्रेरणादायी आहे. स्मृतिदिनाच्या निमित्ताने आपण त्यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांचे आचरण करण्याचा संकल्प करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

# अभिनय, सुसंस्कृतता आणि स्पष्टवक्तेपणाची ओळख : जया बच्चन


ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जन्मदिन विशेष

भारतीय चित्रपटसृष्टीत आपल्या सहजसुंदर अभिनयाने आणि प्रभावी व्यक्तिमत्त्वाने वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या जया बच्चन यांचा ९ एप्रिल रोजी जन्मदिन. हा दिवस त्यांच्या कलात्मक आणि सामाजिक योगदानाचा गौरव करण्याचा खास दिवस आहे. एक उत्कृष्ट अभिनेत्री, संवेदनशील व्यक्ती आणि ठाम विचारांची राजकारणी म्हणून त्यांनी अनेक क्षेत्रांत आपला ठसा उमटवला आहे.

जया बच्चन यांचा जन्म ९ एप्रिल १९४८ रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. त्यांनी फिल्म अ‍ॅण्ड टेलिव्हीजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामधून अभिनयाचे शिक्षण घेतले आणि आपल्या कारकिर्दीची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या अभिनयात नैसर्गिकता आणि भावनिक खोली यांचा सुंदर संगम दिसून येतो.

१९७० च्या दशकात त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत आपले वेगळे स्थान निर्माण केले. 'गुड्डी', 'अभिमान', 'मिली' आणि 'शोले' यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. विशेषतः 'गुड्डी'मधील निरागस मुलगी आणि 'अभिमान'मधील भावनिक संघर्ष अनुभवणारी पत्नी या भूमिका त्यांनी अत्यंत प्रभावीपणे साकारल्या.



जया बच्चन यांच्या अभिनयाची खासियत म्हणजे त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा अत्यंत वास्तवदर्शी आणि मनाला भिडणाऱ्या असतात. त्या काळात ग्लॅमरपेक्षा आशयप्रधान भूमिका निवडून त्यांनी स्त्री-अभिनयाला एक वेगळी दिशा दिली. त्यांच्या कामगिरीमुळे त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

चित्रपटसृष्टीबरोबरच त्यांनी राजकारणातही सक्रिय सहभाग घेतला. त्या समाजवादी पार्टी या पक्षाच्या राज्यसभेतील सदस्य म्हणून कार्यरत राहिल्या आहेत. संसदेत त्यांनी विविध सामाजिक आणि सांस्कृतिक विषयांवर स्पष्ट व ठाम भूमिका मांडल्या आहेत.

जया बच्चन या केवळ अभिनेत्री म्हणूनच नव्हे, तर एक संवेदनशील आई, पत्नी आणि समाजाभिमुख व्यक्ती म्हणूनही ओळखल्या जातात. त्यांचे जीवन म्हणजे समतोल, संस्कार आणि मूल्यांचे उत्तम उदाहरण आहे.

त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कर्तृत्वाचे स्मरण करून त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या अभिनयातील प्रामाणिकपणा आणि समाजातील प्रश्नांबाबतची जागरूकता ही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.

# दुबईच्या जगप्रसिद्ध बँकेकडून भारतातील प्रायव्हेट बँक खरेदी

## एक खर्व ८० अरब रुपयांची डील; आरबीआयची मंजुरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतीय बँकिंग क्षेत्रात मोठी घडामोड घडली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने दुबईस्थित एमिरेट्स नॅशनल बँक ऑफ दुबईला आरबीएल बँकेतील बहुसंख्य भागभांडवल खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे. एक खर्व ८० अरब रुपयांची ही सर्वांत मोठी डील आहे. एमिरेट्स एनबीडीने ऑक्टोबर २०२५ मध्ये आरबीएल बँकेतील ६० टक्के बहुसंख्य भागभांडवल २६,८५३ कोटी रुपयांना विकत घेण्याची इच्छा व्यक्त केली होती.




भारतीय बँकिंग क्षेत्रात एक मोठी डील झाली आहे. प्रस्तावित कराराला आरबीआयची मंजुरी दिली आहे. या व्यवहाराचा मार्ग मोकळा झाला आहे. सुमारे २६,८५० कोटी रुपयांच्या या करारानुसार एक परदेशी कंपनी ६० टक्के हिस्सा विकत घेण्याच्या तयारीत आहे. या बातमीनंतर गुंतवणूकदार आणि सामान्य ग्राहकांच्या मनात अनेक प्रश्न आहेत. का करारामुळे काय बदलणार, त्याचे फायदे काय असतील आणि पुढे काय करायला हवे?

### पुण्यातील आजपर्यंतची सर्वात मोठी रेंटल डील

दोन अब्ज ६३ कोटी रुपये भाडे, मोठ्या इंटरनॅशनल कंपनीने पुण्यात पूर्ण इमारत भाड्याने घेतली. आरबीएल बँक आणि एमिरेट्स एनबीडी यांच्यातील मोठा करार आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. २ एप्रिल २०२६ रोजी रात्री मंजूर झालेल्या या कराराला आरबीआयने मंजुरी दिली आहे. संपूर्ण व्यवहारातील हा सर्वांत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. कारण आरबीआयच्या मंजुरीशिवाय कोणताही मोठा बँकिंग व्यवहार पुढे जाऊ शकत नाही. पुढचा टप्पा आरबीएल बँकेच्या संचालक मंडळाचा असेल. बँकेच्या संचालक मंडळाची यासंदर्भात बैठक होणार असून, त्यानंतर या व्यवहाराचा अधिकृत तपशील जाहीर केला जाईल.

### या व्यवहाराची घोषणा

सर्वप्रथम ऑक्टोबर २०२५ मध्ये करण्यात आली होती. या करारानुसार एमिरेट्स एनबीडी बँक आरबीएल बँकेत अंदाजे २६ हजार ८५० कोटी रुपयांची गुंतवणूक करून तिचा सुमारे ६० टक्के हिस्सा विकत घेईल. ही गुंतवणूक प्राधान्य समभागांद्वारे केली जाईल, म्हणजेच प्रतिशेअर २८० रुपये दराने नवीन शेअर जारी केले जातील.

### आरबीएलच्या ग्राहकांवर काय परिणाम होणार?

आरबीएल बँकेच्या ग्राहकावर याचा काय परिणाम होणार याची देखील माहिती समोर आली आहे. तुमचे पैसे पूर्णपणे सुरक्षित राहतील असे स्पष्ट करण्यात आले आहे. आरबीआयने या व्यवहाराला आधीच मंजुरी दिली आहे, म्हणजेच नियामकाने सर्व जोखमींचे मूल्यांकन केले आहे. शिवाय, जेव्हा एखादी मोठी परदेशी बँक गुंतवणूक करते, तेव्हा ती नवीन तंत्रज्ञान, उत्तम सेवा आणि अधिक आर्थिक ताकद आणते. यामुळे भविष्यात बँकेच्या सेवांमध्ये सुधारणा होऊ शकते.

### आरबीआयची मंजुरी

आरबीआयची मंजुरी हा संपूर्ण व्यवहारातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. कारण आरबीआयच्या मंजुरीशिवाय कोणताही मोठा बँकिंग व्यवहार पुढे जाऊ शकत नाही. पुढचा टप्पा आरबीएल बँकेच्या संचालक मंडळाचा असेल. बँकेच्या संचालक मंडळाची आज बैठक होणार असून, त्यानंतर या व्यवहाराचा अधिकृत तपशील जाहीर केला जाईल.

### उपकंपनी म्हणून काम करणार?

आरबीआयने म्हटले आहे, की या बँकेचे वर्गीकरण परदेशी बँकेची उपकंपनी म्हणून केले जाईल. एमिरेट्स एनबीडी ही तिची मूळ कंपनी असेल. ही बँक पूर्णपणे परदेशी मालकीच्या उपकंपन्यांसाठी असलेल्या नियमांनुसार काम करेल, परंतु संचालक मंडळाच्या बैठकीला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांपैकी किमान निम्मे सदस्य स्वतंत्र संचालक असण्याच्या आवश्यकतेतून तिला सूट दिली जाईल. भारताच्या स्पर्धा नियामकाने जानेवारीमध्ये या कराराला मंजुरी दिली. आरबीआयची ही मंजुरी एका वर्षासाठी वैध आहे. गेल्या वर्षभरात भारताच्या वित्तीय सेवा क्षेत्रातील व्यवहारांचा वेग वाढला आहे. ही मंजुरी अशा वेळी मिळाली आहे, जेव्हा त्या प्रदेशात सुरू असलेल्या युद्धामुळे आखाती देशांतील व्यवसायांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

जलसंधारण दिन विशेष

# पाण्याचे महत्त्व आणि आपल्या जबाबदाऱ्या

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

मानवाच्या जीवनातील सर्वात मूलभूत आणि अमूल्य संसाधन म्हणजे पाणी. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि हवामान बदल यांच्या पार्श्वभूमीवर पाण्याची टंचाई ही गंभीर समस्या बनत आहे. अशा वेळी जलसंधारण दिन आपल्याला पाण्याचे महत्त्व आणि त्याच्या संवर्धनाची गरज अधोरेखित करून देतो.



जलसंधारण म्हणजे पाण्याचा योग्य वापर, साठवण आणि पुनर्वापर करण्याची प्रक्रिया. पावसाचे पाणी साठवणे, भूजल पातळी वाढवणे, नद्या-तलाव स्वच्छ ठेवणे आणि पाण्याचा अपव्यय टाळणे हे जलसंधारणाचे प्रमुख घटक आहेत. आज अनेक भागांमध्ये पाण्याची कमतरता जाणवत असल्यामुळे या विषयाकडे गांभीर्याने पाहणे अत्यावश्यक झाले आहे.

भारतामध्ये जलसंधारणासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. 'जलयुक्त शिवार अभियान' हा महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, त्याद्वारे दुष्काळग्रस्त भागांमध्ये जलसाठे निर्माण करून शेतीला बळकटी देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच Atal Bhujal Yojana ही योजना भूजल व्यवस्थापन सुधारण्यासाठी राबविली जात आहे.

पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात काही सोपे बदल करणे आवश्यक आहे. नळ चालू ठेवणे टाळणे, पावसाचे पाणी साठवणे, शेतीमध्ये ठिबक सिंचनाचा वापर करणे आणि पाण्याचा पुनर्वापर करणे या उपाययोजना अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. याशिवाय वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षण हेही जलसंधारणाशी निगडित आहेत. झाडे जमिनीतील पाण्याची पातळी टिकवून ठेवण्यास मदत करतात आणि पावसाचे प्रमाण संतुलित ठेवतात. त्यामुळे पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्था यांनीही जलसंधारणाबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. लहानपणापासूनच मुलांना पाण्याचे महत्त्व पटवून दिल्यास भविष्यात जबाबदार नागरिक घडतील.

जलसंधारण दिन हा केवळ औपचारिकता न राहता तो आपल्या कृतीत उतरवणे महत्त्वाचे आहे. "पाणी वाचवा, जीवन वाचवा" हा संदेश प्रत्येकाने मनात ठेवून पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे जतन करणे हीच आजची खरी गरज आहे. पाण्याचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. चला, या जलसंधारण दिनानिमित्त आपण सर्वजण पाणी जपण्याचा संकल्प करूया आणि उज्ज्वल, सुरक्षित भविष्यासाठी योगदान देऊया.

# जुनून हो तो ऐसा : पहले आयआरएस, फिर बनी आयएएस...
## यूपीएससी में हासिल की ६९ वीं रैंक, बिहार की कुमुद मिश्रा को मिला होम कैडर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सक्सेस स्टोरी

बिहार की बेटी कुमुद मिश्रा ने संघ लोकसेवा आयोग (यूपीएससी) २०२४ की परीक्षा में अखिल भारतीय स्तर पर ६९ वीं रैंक हासिल कर अपने प्रदेश और परिवार का मान बढ़ाया है। कुमुद मूल रूप से बिहार के रोहतास जिले की रहने वाली हैं और सबसे खास बात यह है कि उन्हें अपना गृह राज्य यानी 'बिहार कैडर' ही आवंटित हुआ है। उनके साथ ९ अन्य नए आईएएस अधिकारी भी बिहार को मिले हैं, जो राज्य की प्रशासनिक व्यवस्था में नई ऊर्जा भरेंगे।

### कहां से हुई कुमुद की पढ़ाई-लिखाई?

कुमुद की प्रारंभिक शिक्षा लखनऊ के केंद्रीय विद्यालय एएमसी कैंट से हुई। जिसके बाद उन्होंने लखनऊ विश्वविद्यालय से राजनीति विज्ञान में बीए ऑनर्स की डिग्री हासिल की। यूपीएससी में भी उन्होंने अपने पसंदीदा विषय राजनीति विज्ञान और अंतर्राष्ट्रीय संबंध को ही वैकल्पिक विषय के रूप में चुना। स्नातक के दौरान ही उन्होंने तय कर लिया था कि उन्हें देश की सबसे कठिन मानी जाने वाली इस परीक्षा को न केवल देना है, बल्कि इसमें शीर्ष स्थान भी प्राप्त करना है।

### पहले प्रयास में मिली थी २५९ वीं रैंक

सफलता का यह सफर कुमुद के लिए इतना आसान भी नहीं था। अपने पहले प्रयास में उन्होंने २५९ वीं रैंक हासिल की थी और उनका चयन भारतीय राजस्व सेवा (आयआरएस) के लिए हुआ था। हालांकि, आईआरएस की नौकरी मिलने के बावजूद उनके मन में आईएएस न बन पाने का मलाल था। उन्होंने हार नहीं मानी और नौकरी ज्वाइन करने के बाद छुट्टी ली ताकि दोबारा तैयारी पर ध्यान केंद्रित कर सकें। उनकी इसी अटूट जिद और कड़ी मेहनत ने उन्हें दूसरे प्रयास में सफलता के शिखर पर पहुंचा दिया।



### कामयाबी के पीछे 'इंटरनल मोटिवेशन'

कुमुद अपनी इस बड़ी कामयाबी के पीछे 'इंटरनल मोटिवेशन' यानी आंतरिक प्रेरणा को सबसे अहम कारक मानती हैं। उनके अनुसार, परिवार का सहयोग तो हमेशा रहा, लेकिन उनके भीतर एक ऐसी चाहत थी जो उन्हें हर हाल में मुकाम हासिल करने के लिए प्रेरित करती रही। वे कहती हैं कि जब उन्होंने पहली बार परीक्षा दी, तो उन्हें महसूस हुआ कि क्षमता होने के बावजूद कुछ कमियां रह गई हैं, जिन्हें दूर कर उन्होंने दूसरे प्रयास में बेहतर प्रदर्शन किया।

### पिता सेना में कैप्टन पद से सेवानिवृत्त

पारिवारिक पृष्ठभूमि की बात करें तो कुमुद एक अनुशासित माहौल में पली-बढ़ी हैं। उनके पिता बी. एस. मिश्रा भारतीय सेना में कैप्टन पद से सेवानिवृत्त हुए हैं, जबकि उनकी माता इंदु देवी एक कुशल गृहिणी हैं। इंटरव्यू के अनुभव को साझा करते हुए कुमुद बताती हैं कि वह क्षण काफी चुनौतीपूर्ण था। ठंड और नर्वसनेस के कारण वह कुछ सवालों के जवाब नहीं दे पाईं, लेकिन आत्मविश्वास और स्पष्ट सोच की वजह से कुल मिलाकर उनका साक्षात्कार बेहतरीन रहा, जिसने अंततः उन्हें आईएएस की प्रतिष्ठित कुर्सी तक पहुंचा दिया।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# तुलसीदास जी और हनुमान चालिसा...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एक कथा कहती है कि तुलसीदास जी जब हनुमान चालीसा लिखते थे लिखे पत्रों को रात में संभाल कर रख देते थे सुबह उठकर देखते तो उन में लिखा हुआ कोई मिटा जाता था। तुलसीदास जी बहुत परेशान हुए उन्होंने हनुमान जी की आराधना की, हनुमान जी प्रकट हुए तुलसीदास ने बताया कि मैं हनुमान चालीसा लिखता हूं तो रात में कोई मिटा जाता है। हनुमान जी बोले वह तो मैं ही मिटा जाता हूं। तुलसीदास जी श्री हनुमान जी के चरणों में गिर पड़े तो हनुमान जी ने कहा अगर प्रशंसा ही लिखनी है तो मेरे प्रभु श्री राम की लिखो मेरी नहीं, तुलसीदास जी को उस समय अयोध्याकांड का प्रथम दोहा याद आया ।

"श्रीगुरु चरन सरोज रज निज मन मुकुरु सुधारिवरनउं रघुबर बिमल जसु जो दायकु फल चारि"उन्होंने हनुमान चालीसा के प्रारंभ में उसे लिख दिया तो हनुमान जी बोले मैं तो रघुवर हूं नहीं तुलसीदास जी ने कहा आप और प्रभु श्री राम तो एक ही प्रसाद ग्रहण करने से अवतरित हुए हैं इसलिए आप भी रघुवर ही है।तुलसीदास ने याद दिलाया कि ब्रह्म लोक में सुवर्चला नाम की एक अप्सरा रहती थी जो एक बार ब्रह्मा जी पर मोहित हो गई थी जिससे क्रुद्ध होकर ब्रह्माजी ने उसे गिद्धि होने का श्राप दे दिया था।वह रोने लगी तो ब्रह्मा जी को दया आ गई उन्होंने कहा राजा दशरथ के पुत्र यज्ञ में हवि के रूप में जो प्रसाद तीनों रानियों में वितरित होगा तू कैकेई का भाग लेकर उड़ जाएगी मां अंजना भगवान शिव से हाथ फैला कर पुत्र कामना कर रही होगी उन्ही हाथों में वह प्रसाद गिरा देना जिससे आप अवतरित हुए।फिर प्रभु श्री राम ने तो स्वयं आपको अपना भाई कहा है"तुम मम प्रिय भरतहि सम भाई"तुलसीदास ने एक और तर्क दिया कि जब आप मां जानकी की खोज में अशोक वाटिका गए थे तो मां जानकी ने आपको अपना पुत्र बनाया था"अजर अमर गुननिधि सुत होहूकरहु बहुत रघुनायक छोहू"जब मां जानकी की खोज करके वापस आए थे तो प्रभु श्री राम ने स्वयं आपको अपना पुत्र बना लिया था इसलिए भी आप रघुवर हुए "सुनु सुत तोहि उरिन मैं नाहीं देखेउं करि विचार मन माहीं।"

# परनिंदा करते साधनेची होळी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

परनिंदा व विद्येचा अभिमान (अहंकार) माणसाला भगवंतापासून दूर नेतात. परनिंदा करण्यासारखे पाप नाही. निंदेची सवय फार वाईट असते; तिच्यामुळे आपले स्वतःचेच नुकसान होते. दुसऱ्याला दुःख व्हावे म्हणून माणूस परनिंदा करतो, पण ती ऐकायला तो हजरच कुठे असतो? म्हणजे मग आपण यात काय साधले ? निंदेमुळे आपलेच मन दूषित होते. दूषित मन किंवा दुष्कर्म हे माणसाच्या साधनेचे अधःपतन करते. ज्याला परनिंदा गोड वाटते, त्याने समजावे की आपल्यापासून भगवंत अजून फार दूर आहे. तिखट तिखटाप्रमाणे लागू लागणे ही जशी सापाचे विष उतरल्याची खूण आहे, त्याचप्रमाणे परनिंदा गोड वाटेनाशी झाली की देव जवळ येत चालल्याची खूण समजावी. म्हणून ज्याला स्वतःचे हित करून घ्यायचे असेल त्याने परनिंदा सोडून द्यावी आणि जीभ नामामध्ये लावावी. म्हणून संत म्हणतात, ''जिभले तुला काय धंदा, भज गं घडीभर गोविंदा''.

भगवंताच्या मार्गाने जाणाऱ्याने दुसऱ्याच्या ठिकाणी दिसणाऱ्या दोषांचे बीज आपल्यामध्ये आहे हे ध्यानात ठेवून वागावे. कारण 'यथा दृष्टी तथा सृष्टी' म्हणून अवगुणाचे तृण आपल्या अंतःकरणातून काढून टाकावे व तेथे भगवंताच्या नामाचे बीज पेरावे. पुष्कळ वेळा आपले दोष आपल्याला कळतात, पण नाम हे त्यावर उपाय आहे ते घेत राहावे. नाहीतर हे भगवंताच्या भेटीच्या आड येतात हे ध्यानात घ्यावे, हे दोष ज्याचे त्याला सुधारता येत नाहीत. पण सत्संगती जर लाभली तर मात्र हे दोष देखील सुधारतात. हाच संतांच्या संगतीचा महिमा आहे. मनुष्य स्वभावतः आपले दोष दुर करण्याचा प्रयत्न करीत नसल्यामुळे त्याचे जीवन सुखमय होत नाही. तो दुसऱ्याला त्याचा दोष दाखवून देईल, पण त्याला स्वतःला आपला दोष कळणार नाही.

विद्या विनयने शोभते पण तिने अहंकाराचे रूप घेतले तर ही मनुष्याला भगवंतापासून दूर नेते. वारकरी पंथातले अडाणी लोक 'विठ्ठल-विठ्ठल' म्हणता-म्हणता भगवंताला ओळखतात, पण शहाणे लोक परमार्थाची पुस्तके वाचूनही त्याला ओळखीत नाहीत. घरात बदाम आणि खारका यांची पोती भरून ठेवली, तरी ते पदार्थ जोपर्यंत हाडामांसात जाऊन रक्तांत मिसळत नाहीत तोपर्यंत त्यांचा उपयोग नाही. त्याचप्रमाणे, पुस्तकी ज्ञानाचे पर्यवसान आचरणात झाले नाही तर ते व्यर्थ जाते. भगवंत प्राप्तीकरिता कुणीही प्रयत्न करू नका; तर नाम प्रयत्नाने घ्यावे. भगवंत सात्त्विक प्रेमाने साध्य होणारे आहेत. तुम्ही भगवंतात प्रेम वाढवा, म्हणजे मग सर्व जग प्रेममय दिसू लागेल, आणि शेवटी तुम्हाला स्वतःचा विसर पडेल.

**। श्री गुरुदेव दत्त ।**



# माहूरगडाचे पवित्र रहस्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

माहूरगडावरील पवित्र मातृतीर्थ हे केवळ एक साधा तलाव नाही, तर ते जगदंबा श्री रेणुका मातेच्या पावन स्मृतींनी पवित्र झालेले दिव्य तीर्थस्थान आहे. या पवित्र स्थळाबद्दल भक्तांच्या मनात अपार श्रद्धा, भक्ती आणि भावनिक नाते आहे. माहूरगडावर येणारा प्रत्येक भाविक येथे येऊन मातृतीर्थाचे दर्शन घेतो आणि मातेच्या चरणी आपली प्रार्थना अर्पण करतो. हे तीर्थ आईवरील अपार प्रेम, कर्तव्य आणि मातृभक्तीचे जीवंत प्रतीक मानले जाते. भक्त जेव्हा मातृतीर्थाच्या काठी उभा राहतो, तेव्हा त्याला आईच्या मायेची, आशीर्वादाची आणि आध्यात्मिक शांततेची अनुभूती मिळते. परंपरेनुसार मातृतीर्थातील पवित्र पाणी दररोज जगदंबा रेणुकामातेच्या अभिषेकासाठी नेले जाते. त्यामुळे या तीर्थाचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व अत्यंत मोठे आहे. तसेच अनेक भाविक भक्तिभावाने मातेची 'तादळा रूपी पूजा' करतात. या पूजेसाठी वापरला जाणारा तादळा हा माती किंवा गाळ नसून एक पवित्र दगड असतो आणि तो याच मातृतीर्थातून भक्तिभावाने काढून नेला जातो, अशी प्राचीन परंपरा आजही जपली जात आहे.

पूर्वी या मातृतीर्थातून तादळा काढण्याचे पवित्र कार्य पालखीचे भोई करत असत, ही एक जुनी आणि गौरवशाली परंपरा मानली जाते. म्हणूनच मातृतीर्थ हे केवळ एक तीर्थ नसून माहूरगडाच्या धार्मिक परंपरेचे आणि भक्तीचे जीवंत प्रतीक बनले आहे. म्हणूनच माहूरगडावर येणारा प्रत्येक भक्त मातृतीर्थाचे दर्शन घेतल्याशिवाय आपली यात्रा पूर्ण झाली, असे मानत नाही. कारण हे तीर्थ म्हणजे मातृभक्तीचे, श्रद्धेचे आणि जगदंबा रेणुकामातेच्या कृपेचे पवित्र केंद्र आहे.



# भक्ताच्या जीवनाला दिशा देणारी आदिशक्ती 'रेणुका माता'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या पवित्र भूमीत वसलेला माहूरगड म्हणजे भक्ती, शक्ती आणि मातृत्वाचा जीवंत अनुभव देणारे दिव्य स्थान. या गडावर अधिष्ठित असलेली श्री रेणुका माता ही केवळ एक देवी नाही, तर संपूर्ण सृष्टीची जननी, प्रत्येक भक्ताच्या जीवनाला दिशा देणारी आदिशक्ती आहे. तिच्या चरणी नतमस्तक झाल्यावर मनातील दुःख, चिंता, अहंकार आपोआप नाहीसा होतो आणि आईच्या मायेचा गोड स्पर्श मनाला समाधान देऊन जातो. महत्त्वाचे म्हणजे माहूरगडावरील श्री रेणुका माता ही महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी एक 'पूर्ण शक्तीपीठ' म्हणून ओळखली जाते. त्यामुळे या स्थानाचे आध्यात्मिक महत्त्व अधिकच वाढत आहे.

माहूरगड हे केवळ तीर्थक्षेत्र नाही, तर भक्तांच्या श्रद्धेचं केंद्र आहे. येथे येणारा प्रत्येक भक्त आपल्या आयुष्यातील संकटे, दुःख, समस्या मातेच्या चरणी अर्पण करतो आणि परत जाताना नव्या आशेने, नव्या ऊर्जेने भरून जातो.

नवरात्र असो किंवा कोणताही दिवसमाहूरगडावरची भक्तांची गर्दी कधीच कमी होत नाही. कारण येथे केवळ दर्शन नाही, तर मातेचा साक्षात अनुभव मिळतो मनापासून हाक मारली की माता नक्कीच धावून येते, असा भक्तांचा अढळ विश्वास आहे.

- मातेच्या कृपेने अशक्यही शक्य होते.
- अडचणी दूर होतात आणि जीवनाला नवी दिशा मिळते.

आजच्या धावपळीच्या, तणावाच्या जीवनात जर खऱ्या शांततेचा शोध घ्यायचा असेल, तर एकदा मनापासून रेणुका मातेच्या चरणी नतमस्तक व्हा

तुम्हाला स्वतःच तिची कृपा, माया आणि शक्ती अनुभवायला मिळेल.

**। जय रेणुका माता, जय माहूरगड ।**

# सुंठवडा बनविताना कोणते घटक वापरतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



श्रीराम नवमी व हनुमान जयंती चैत्र महिन्यात येते. चैत्र महिना म्हणजे वसंत ऋतू आणि या ऋतूमध्ये होणाऱ्या हवामानातील बदलांमुळे शरीरात कफ वाढतो. त्यामुळे सांधेदुखी, सर्दी-खोकला, ॲलर्जी असे त्रास होतात. प्रत्येकाची प्रतिकारशक्ती, वय, व्यवसाय व प्रकृतीनुसार शरीरात वेगवेगळे बदल होतात. शरीरात झालेल्या बदलांमुळे जडत्व येते, सुस्ती येते. तसेच या बदलांसाठी बाहेरील वातावरण पोषक असते. म्हणून या सगळ्याला आळा घालण्यासाठी सुंठ फार उपयुक्त ठरते. सुंठ अँटीइम्फ्लामेंटरी, अँटीऑक्सिडेन्ट आणि कफ कमी करणारे आहे.

आले वाळवले की सुंठ बनते. आले उष्ण आहे. ते पचल्यानंतर तिखट रस बनतो तर सुंठ पचल्यानंतर गोड रस बनतो. म्हणून एकाच वेळेला शरीरातील वात व कफ कमी होतो, म्हणूनच की काय आपल्याकडे सुंठ आणि खोकला या यासंदर्भात म्हण देखील आहे 'सुंठी वाचून खोकला..' सुंठीला 'विश्वा' असे दुसरे नाव आहे. अनेक आजारांवर गुणकारी असल्याने त्याला विश्वऔषध असे म्हणतात. पारंपरिक पद्धतीने सुंठवडा बनवताना त्यात ६ घटक वापरले जातात. सुंठ, सुके खोबरे, खडीसाखर, धणे, ओवा, वेलची आणि हे सर्व ६ घटक दगडी खलबत्ता वर बारीक वाटून सुंठवडा तयार केला जातो. आपण सुंठ, खडीसाखर कुटुन वा पिठीसाखर, वेलदोडा व तूप असे मिश्रण करूनही बनवू शकतो.

## सुंठाचे फायदे


कंबरदुखी, आमवात, संधीवात यावर सुंठ उपयुक्त आहे. मासिक पाळीच्या वेळेस उद्भवणारी पोटदुखी आणि प्रसूतीनंतर गर्भाशय पूर्वावस्थेत आणण्यासाठी सुंठ फायदेशीर ठरते. तसेच नैराश्य येणे, भीती वाटणे, आत्मविश्वासाची कमतरता यांसारखे मानसिक त्रास होऊ नयेत म्हणून देखील सुंठ फायदेशीर आहे.

## खडीसाखरेचे फायदे

चवीला गोड असणारी खडीसाखरमध्ये औषधी गुणधर्म असतात, आयुर्वेदात खडीसाखरेचे थंड, पौष्टिक, गोड, हलकी, बलवर्धक, डोळ्यांना हितकारक, उलटीवर उपयुक्त असे आरोग्यदायी गुणधर्म सांगितले आहेत. खडीसाखर चघळल्यास कफाचा त्रास कमी होतो, घशातील खवखव, खोकला दूर होतो. उन्हाळ्याच्या दिवसांत खडीसाखर टाकलेले पाणी पिल्याने शरीराला ताकद मिळते. खडीसाखर ताणतणाव कमी करण्यास, रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासही मदत करते. सुंठवडा हा उष्ण असल्यामुळे हा कमी प्रमाणात खावा. म्हणूनच आपण प्रसाद म्हणून सुंठवडा खातो. श्रीराम नवमीनंतर १० ते १२ दिवस रोज दुपारी १२ ते २ च्या दरम्यान जेवणानंतर एक चमचा सुंठवडा नक्की खा. पित्त व उष्ण प्रकृती असलेल्यांना सुंठवडा फार सहन होईल, असे नाही म्हणून त्यांनी सुंठवडा साजूक तुपासोबत खावा. थोडक्यात काय तर आपल्या या भारतीय परंपरेचा आरोग्य अर्थ जाणून घेऊन सण साजरे केले पाहिजेत.

# मारुतीरायांचे मूर्ती प्रकार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**१) वीर मारुती**

वीरासनात बसलेले, एक गुडघा जमिनीला टेकवलेले आणि एक उंच केलेले. पटकन उठता येईल अशा पोजमध्ये बसलेला असतो. त्यांच्या हातात गदा असते.

**२) दास मारुती**

हात जोडून उभे असलेले. सेवेसी तत्पर असे दक्ष हनुमानजी.

**३) श्रीरामसेवक मारुती**

दोन्ही खांद्यावर श्रीराम-लक्ष्मण यांना घेऊन निघालेले असतात. श्रीरामांची सेवा करतात म्हणून दास मारुती. कधी-कधी केवळ श्रीरामच खांद्यावर असतात.

**४) मिश्र मूर्ती**

पाय जुळवलेले आणि हात जोडलेले, म्हणजे हे भक्त मारुती झाले. त्यांना दोनच हात असले तरी त्यांना धनुष्यबाण, ढाल, तलवार दाखविलेले असतात. वीर आणि भक्त मारुतींची सांगड घालणारी ही मूर्ती.

**५) योगी मारुती**

योगांजनेय (अंजनी + योगी)

वार्ता विज्ञापन करणारे हनुमानजी - वार्ताहर हनुमानजी म्हटले तरी चालेल. विमानअर्चनाकल्प ग्रंथाच्या २१ व्या अध्यायात याचा उल्लेख आहे. उजवा हात तोंडावर ठेवून डाव्या हातात वस्त्राचा काठ धरून उभे असतात आणि श्रीरामांना बातमी सांगत असतात. गुप्तपणे एखादी बातमी सांगण्याचा जो आविर्भाव असतो तसा आविर्भाव या मूर्तीत असल्यामुळे ते तोंडावर हात ठेवून उभे असतात.

**६) वीणा पुस्तकधारी हनुमानजी**

मारुतीरायांना संगीत आणि गायनाचीदेखील देवता मानले जाते. मारुतीराय चांगले संगीत-गायनतज्ज्ञ होते. या मूर्तीच्या उजव्या हातात वीणा आणि डाव्या हातात पोथी असते. हा दक्षिणेत आंध्रात पाहावयास मिळतो. आंध्रात चतुर्भुज मारुतीरायांची मूर्ती पाहावयास मिळते.

**७) पंचमुखी मारुती**

हे महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी पाहावयास मिळतात. मुख्य तोंड वानराचे, सिंह, गरुड एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला वराह आणि अश्व यांचे मुख असते. यासंदर्भात एक कल्पना अशी ही आहे, की वैकुठांची मूर्ती आहे त्यालादेखील सिंह, वराह, अश्व, गरुड यांचे तोंड असते. मधले तोंड हे वासुदेवांचे असते. येथे वानराचे आहे. त्यामुळे यावरून या मूर्तीची संकल्पना घेतलेली असावी, असा समज आहे.

# गुढीपाडवा ते बलिप्रतिपदा : साडेतीन मुहूर्तांचा महिमा

साडेतीन मुहूर्त हे भारतीय संस्कृती आणि विशेषतः हिंदू परंपरेत अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. त्यांना 'स्वयंसिद्ध मुहूर्त' असेही म्हणतात. याचा अर्थ असा, की या दिवशी कोणत्याही कार्यासाठी शुभ वेळ शोधण्याची गरज नसते. हा संपूर्ण दिवसच पवित्र असतो. असे संपूर्ण दिवस पवित्र-शुभ असलेले हिंदू परंपरेनुसार हे मुहूर्त पुढीलप्रमाणे आहेत.

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा. या दिवशी पूर्ण मुहूर्त असते. तसे अक्षय्य तृतीया (आखाजी) म्हणजे वैशाख शुद्ध तृतीया व अश्विन शुद्ध दशमी (दसरा-विजया दशमी हे देखील पूर्ण मुहूर्त आहेत. मात्र, बलिप्रतिपदा (दिवाळी पाडवा) अर्थात कार्तिक शुद्ध प्रतिपदा हा अर्धा मुहूर्त गणला जातो.



पौराणिक कथा आणि संदर्भ पाहता प्रत्येक मुहूर्ताशी एक विशेष पौराणिक घटना जोडलेली आहे. जसे- गुढीपाडवा या दिवशी ब्रह्मदेवाने विश्वाची निर्मिती केली, असे मानले जाते. तसेच प्रभू श्रीरामचंद्र १४ वर्षांचा वनवास संपवून अयोध्येत परतले तेव्हा प्रजेने गुढ्या उभारून त्यांचे स्वागत केले होते. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी त्रेतायुगाचा प्रारंभ झाला, असे मानले जाते. तीन वेळा पृथ्वी निक्षत्रिय करणाऱ्या भगवान परशुरामांचा जन्म देखील याच दिवशी झाला. पौराणिक कथेनुसार या दिवशी केलेले दान आणि सत्कर्म कधीही न संपणारे अक्षय राहते. विशेष म्हणजे याच दिवशी व्यासांनी गणपती बाप्पांना 'महाभारत' सांगायला सुरूवात केली होती.

दसरा अर्थात विजयादशमी या दिवशी प्रभू श्रीरामचंद्रांनी रावणाचा वध करून अधर्मावर धर्माचा विजय मिळविला. तसेच याच दिवशी देवी दुर्गेने महिषासुराचा वध केला होता. पांडवांनी अज्ञातवास संपवून आपली शस्त्रे शमीच्या झाडावरून परत घेतली होती आणि अर्धा मुहूर्त असलेल्या बलिप्रतिपदा या दिवशी भगवान विष्णूंनी वामनावतार घेऊन बळीराजाला पाताळात पाठविले होते. बळीराजाच्या दानशूरतेवर प्रसन्न होऊन देवाने त्याला वर्षातून एकदा पृथ्वीवर येण्याचा आशीर्वाद दिला होता. हा दिवस पौराणिक कथा व शास्त्रानुसार अर्धा मुहूर्त मानला जातो.

या चार तिथींना 'महत्त्वाचे' किंवा 'स्वयंसिद्ध' म्हणण्याचे कारण म्हणजे ज्योतिषशास्त्र आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून याची काही प्रमुख कारणे आहेत. एकतर या काळात ग्रहांची स्थिती इतर दिवसांपेक्षा अलौकिक असते. ज्योतिषशास्त्रानुसार या दिवसांमध्ये सूर्य आणि चंद्र स्वतःच्या उच्च राशीत किंवा अत्यंत शुभ स्थितीत असतात. सूर्याचे तेज आणि चंद्राची शीतलता पृथ्वीला सकारात्मक ऊर्जा देतात. असे मानले जाते, की या दिवशी सुरू केलेले कोणतेही कार्य कधीही निष्फळ जात नाही. त्यात यश मिळण्याची शक्यता सर्वाधिक असते.

सामान्यतः कोणतेही शुभ काम करताना आपण 'राहू काळ' किंवा 'वर्ज्य वेळ' पाहतो. परंतु या साडेतीन मुहूर्तांवर नैसर्गिकरीत्याच इतकी सकारात्मकता असते की कोणताही अशुभ काळ त्यावर प्रभाव पाडू शकत नाही. म्हणूनच यांना 'स्वयंसिद्ध' मुहूर्त म्हणतात. आणि त्याचसाठी या दिवसांना पंचांग पाहण्याची गरज नसते.

या सण तथा तिथींना सामाजिक आणि व्यावहारिक महत्त्व देखील आहे. व्यावहारिक पातळीवर या दिवशी लोक प्रामुख्याने नवीन घर, वाहन किंवा सोन्याची खरेदी करणे, वास्तू प्रवेश, नवीन उद्योगाची किंवा दुकानाची सुरूवात करतात. पाटी पूजन करून लहान मुलांच्या शिक्षणाची सुरूवात केली जाते. सीमोल्लंघन म्हणजेच दसऱ्याच्या दिवशी प्रगतीसाठी आपली मर्यादा ओलांडून पुढे जाण्याचा संकल्प करतात. थोडक्यात सांगायचे, तर हे साडेतीन मुहूर्त म्हणजे निसर्ग, अध्यात्म आणि ज्योतिष यांचा असा संगम आहे जो मानवाला नवीन सुरूवातीसाठी प्रेरणा आणि सकारात्मक ऊर्जा देतो.

**- धनंजय सोनार, सामाजिक कार्यकर्ते, अमळनेर.**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)